# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.शहर सुधारणा समिती

## कार्यपत्रिका क्रमांक -१

## सभावृत्तांत

दिाांक - १६.०४.२०१२ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पहिली सभा (विशेष सभा) सोमवार, दिनांक १६.०४.२०१२ रोजी दुपारी १.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस मा.अनिल कवडे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद,पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.यमुनाताई रमणनाना पवार
२) मा.उल्हास शेट्टी
३) मा.प्रशांत शितोळे
४) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
५) मा.बो-हाडे शुभांगी संजय

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

(मा.शहर सुधारणा समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आली होती.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी- (पिठासीन अधिकारी) सर्वांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर नेमणुक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मा.नगरसचिव-विषय क्रमांक १ - मा.शहर सुधारणा समितीच्या सभापतींची नेमणुक करणे.मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदासाठी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार,त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १). | बो-हाडे शुभांगी संजय | उल्हास शेट्टी | यमुनाताई रमणनाना पवार |

[मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त एकूण एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासिन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केले. मा.पिठासिन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली. ]

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी :- मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एका नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन ते नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.
**(पिठासीन अधिकारी)**

सभापती शहर सुधारणा समिती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे.

१) बो-हाडे शुभांगी संजय

कोणत्याही उमेदवारास १५ मिनीटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी यांजकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल अशी तरतुद असल्याने त्याप्रमाणे १५ मिनीटांचा अवधी देणेत येत आहे.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला दु. ०१ = १० ते दु. ०१= २५ हा १५ मिनीटांचा अवधी संपला)

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी -उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनीटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणुक लढविणा-या मा.बो-हाडे शुभांगी संजय या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.
(पिठासीन अधिकारी)

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक - १
दिनांक - १६.४.२०१२ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती सभापती पदासाठी एक नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले असुन वैध ठरलेले आहे. त्यामध्ये

मा.शहर सुधारणा समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.बोऱ्हाडे शुभांगी संजय हया एकच रितसर नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा. बोऱ्हाडे शुभांगी संजय** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-

**(अनिल कवडे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हापरिषद
पिठासीन अधिकारी
शहर सुधारणा समिती (विशेषसभा)

---------

(नवनिर्वाचित सभापती **मा. बोऱ्हाडे शुभांगी संजय** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

---------

**मा.नगरसचिव** -विषय क्रमांक २ मा. शहर सुधारणा समितीच्या उपसभापतींची नेमणुक करणे. मा.शहर सुधारणा समितीचे उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नाही.

ठराव क्रमांक -२ विषय क्रमांक - २
दिनांक- १६/०४/२०१२
सूचक - मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक - मा.प्रशांत शितोळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीच्या, उपसभापती पदासाठी एकही नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले नसल्याने मा.शहर सुधारणा समितीच्या उपसभापतीची नेमणुक मा.सभापती निश्चित करतील त्या विशेष सभेत करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १६.०४.२०१२
सूचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :-मा.प्रशांत शितोळे

मा.शहर सुधारणा समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी दुपारी १२.०० वाजता विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्ट्या असलेस त्या सुट्टी/सुट्ट्यानंतर येणारे

कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १२.०० वाजता सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्यावेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(**बोऱ्हाडे शुभांगी संजय**)
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ५६७/१२
दिनांक - १६/०४/२०१२ चे लगत

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.